5237
जावक क्रमांक /२०२३
मुंढवा पोलीस स्टेशन, पुणे
दिनांक ०८ /०८/२०२३

प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो.
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे

**प्रतिवेदक** : अनिल बिनवडे, पोलीस उप-निरीक्षक , मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर
यांजकडून विनंतीपुर्वक की,

**विषय** :दाखल गुन्ह्यातील अपहृत मुलीची स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्दी होणेबाबत.

पोलीस निरीक्षक मुंढवा पोलीस ठाणे सत्यमेव जयते पुणे शहर

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, मुंढवा पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. २६५/२०२३, भा. द. वि. कलम ३६३ प्रमाणे दाखल गुन्ह्यातील फिर्यादी नामे लक्ष्मी गोवींद पवार, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. यलाप्पा यांचेकडे भाडयाने, गल्ली नं ३, बालाजीनगर, घोरपडीगांव पुणे, मुळ पत्ता मु. पो. कॅंदगेरा ता. देदुर्ग जि. रायचुर राज्य कर्नाटक मो. नं. ९७६३८०४३७०. यांनी फिर्याद दिली की, “ माझी मुलगी नामे वैशाली गोवींद पवार वय १५ वर्षे रा. सदर ही दिनांक ०७/०८/२०२३ रोजी सकाळी ११/०० वा चे सुमारास मी शाळेत जात आहे असे सांगुन राहते घरातुन निघुन गेली ती अद्यापपर्यंत परत आली नाही. तिला कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी आमचे कायदेशीर रखवालीतुन पळवुन नेले आहे म्हणुन अज्ञात इसमाचे विरोधात फिर्याद दिल्याने वरीलप्रमाणे गुन्हा दाखल आहे.

**अपहृत मुलीचे वर्णन खालीलप्रमाणे**



नाव :- वैशाली गोवींद पवार वय १५ वर्षे (जन्मतारीख ०४/०७/२००८) रा. सदर रंगाने-काळी सावळी, अंगाने सडपातळ, उंची ४ फुट ३ इंच, नाक-सरळ, चेहरा- गोलसर, डोळे-काळे पांढरे, केस- काळे लांब असुन दोन वेण्या घालते, नेसणीस- पांढ-या निळसर रंगाचा शर्ट त्यावर निळ्या रंगाची ओढनी, निळ्या रंगाची पॅन्ट (कुर्ती), पायात- फिक्कट चॉकलेटी रंगाची चप्पल व नकली धातुचे खड्याचे पैजंन, गळयात नकली धातुची चैन त्यामध्ये नकली बदाम असलेले, सोबत लाल व ग्रे रंगाची बॅग मोबाईल वापरत नाही मौल्यवान चीजवस्तु नाही.

तरी वरील वर्णनाच्या अपहृत मुलीचा तपास होणेकामी तिची स्थानिक वृत्तपत्रात फोटो व वर्णनासह प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

मा.सादर व्हावे
ता ०८/०८/२०२३

(अनिल बिनवडे)
पोलीस उप-निरीक्षक,
मुंढवा पोलीस स्टेशन, पुणे

**मार्फतीने सविनय सादर**

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो,
मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
मुंढवा पोलीस स्टेशन, पुणे